# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात

नियमित फौजदारी खटला क्र. २९९/२०२० **निशाणी क्र.१८**

## दोषारोप

मी, व्ही. व्ही. जोशी, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड याद्वारे तुमच्यावर दोषारोप ठेवतो की,

१) दत्तात्रय हरिभाऊ शेळके,
वय–५० वर्ष, धंदाः शेती,
२) कमल दत्तात्रय शेळके,
वय–४५ वर्ष, धंदाःशेती,
दोघे रा.जांबवाडी, ता. जामखेड जि.अहमदनगर.

**खालील प्रमाणेः**

**पहिल्यांदा,** दिनांक०३.०४.२०१८ रोजी सकाळी ०७:३० वा. सुमारास मौजे–जांबवाडी गावात,ता.जामखेड, जि. अहमदनगर येथे तुम्ही आरोपींनी संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, फिर्यादी रत्नमाला भिमराव शेळके हिचा मृत्यू होवु शकतो अशा पध्दतीने तुम्ही आरोपी क्र.२ ने फिर्यादीस जमिनीवर खाली पाडून तिचे दात पाडून तिला इच्छापूर्वक जबर दुखापत पोहचविली; आणि त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३२५** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**दुसऱ्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, फिर्यादीच्या मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असे 'लाकडी काठी' हे हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरुन तुम्ही आरोपी क्र.२ ने काठीने फिर्यादीच्या डोक्यात व तोंडावर मारहाण करून तिला इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली; आणि त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३२४ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**तिसऱ्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, तुम्ही आरोपींनी वर नमूद फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तिला इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्या परिणामी

तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३२३ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**चौथ्यांदा**, वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, वर नमूद फिर्यादीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अगर अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने तुम्ही आरोपींनी वर नमूद फिर्यादीस शिवीगाळ करुन, अपमानीत करुन, उद्युक्त केले व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ५०४ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**शेवटी,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, तुम्ही आरोपींनी फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ५०६ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

मी याद्वारे तुम्हाला निर्देश देतो की, वरील दोषारोपासाठी तुमची या न्यायालयाकडून संपरीक्षा घेण्यात यावी.

स्वाक्षरी/-

दिनांकः २८/०२/२०२४ (व्ही. व्ही. जोशी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड.

दोषारोपातील मजकूर आरोपींना मराठी भाषेत वाचून दाखविण्यात आला व समजून सांगण्यात आला, ज्याकरिता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे व संपरीक्षा घेण्याचे कथन केले.

स्वाक्षरी/-

दिनांकः २८/०२/२०२४ (व्ही. व्ही. जोशी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड.